# उद्योगांच्या सामाजिक उत्तरदायित्वातून विकसीत महाराष्ट्राच्या ध्येयाला बळ : मुख्यमंत्री

## पुणे जिल्ह्यातील मावळ व खेड परिसरात 'शुभ आरंभ' उपक्रमातून उल्लेखनीय परिवर्तन

प्रतिनिधी २३ जुलै

**मुंबई:** राज्य शासनाच्या सर्वसमावेशक विकासाच्या धोरणाला उद्योगांच्या सामाजिक उत्तरदायित्वाची प्रभावी साथ लाभत आहे. शासन आणि उद्योग क्षेत्राच्या भागीदारीतून ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साध्य होत आहे. अशा उपक्रमांमुळे च्विकसित महाराष्ट्र २०४७ज् या राज्याच्या ध्येयाला बळ मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांना पूरक ठरणारे उद्योगांचे सामाजिक उत्तरदायित्वाचे उपक्रम ग्रामीण भागातील नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवत आहेत. आरोग्य, पोषण, जलसुरक्षा, पर्यावरण संवर्धन, क्रीडा आणि शालेय पायाभूत सुविधा या क्षेत्रांमध्ये सातत्यपूर्ण काम करणारे उपक्रम समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. मोंडेलेज इंडियाच्या च्शुभ आरंभज् या प्रमुख सामाजिक उपक्रमांतर्गत गेल्या १३ वर्षांपासून पुणे जिल्ह्यातील मावळ आणि खेड तालुक्यातील ६० गावांमध्ये स्थानिक गरजांनुसार आरोग्य, पोषण, शिक्षण, जलसंधारण, पर्यावरण संवर्धन, क्रीडा आणि समुदाय विकासासाठी विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांमुळे हजारो कुटुंबांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडून आला असून, शासनाच्या विविध योजनांनाही प्रभावी पूरक बळ मिळाले आहे.



**आरोग्य सुविधांचे बळकटीकरण; लाखो नागरिकांना लाभ**

आरोग्य क्षेत्रात आयुष्मान भारत अभियानाशी सुसंगत पद्धतीने ५० हेल्थ अँड वेलनेस सेंटरचे आधुनिकीकरण व सक्षमीकरण करण्यात आले असून, त्याचा सुमारे ३.२ लाख नागरिकांना थेट लाभ झाला आहे. ॲनिमिया मुक्त भारत अभियानाअंतर्गत महिलांमध्ये आणि किशोरवयीन मुलींमध्ये रक्तक्षय ओळखण्यासाठी विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. या माध्यमातून सुमारे ५ हजार उच्च जोखमीच्या गर्भवती महिलांची ओळख करून त्यांना विशेष उपचारासाठी संदर्भित करण्यात आले, तर एक हजारांहून अधिक पाच वर्षांखालील बालकांना प्रगत उपचारासाठी पाठविण्यात आले. याशिवाय, २२६ आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन नवजात बालकांची घरपोच आरोग्य तपासणी, उच्च जोखमीच्या रुग्णांची ओळख आणि प्राथमिक आरोग्य सेवा अधिक प्रभावी करण्यात आली. आरोग्य जनजागृतीसाठी विविध विशेष आरोग्य शिबिरे तसेच जागतिक आरोग्य, क्षयरोग, मातृत्व आणि योग दिन साजरा करण्यात आला.

**ग्रामीण क्रीडा विकासाला नवी दिशा**

'खेलो इंडिया' अभियानाशी सुसंगत 'शुभ आरंभ स्पोर्ट्स फॉर एक्सलन्स' या उपक्रमातून ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा संस्कृती रुजविण्याचे काम करण्यात आले आहे. फुटबॉल आणि कबड्डीसारख्या खेळांमध्ये विद्यार्थ्यांना नियमित प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षक, जीवनकौशल्य प्रशिक्षक आणि स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली आहे.गेल्या दशकात सुमारे ९ हजार विद्यार्थ्यांना विविध क्रीडा प्रशिक्षणाचा लाभ मिळाला असून, त्यामध्ये मुलींचा सहभाग जवळपास ५० टक्के आहे. परिसरात १० क्रीडांगणे विकसित करण्यात आली आहेत. शालेय स्तरापासून राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांना सक्षम करण्याचे कार्य सुरू आहे.

**शाळांमध्ये पायाभूत सुविधा आणि हरित ऊर्जा उपक्रम**

ग्रामीण भागातील शाळांमध्ये सुरक्षित पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी व्यापक पायाभूत सुविधा उभारण्यात आल्या आहेत. २७ आरओ पाणी शुद्धीकरण यंत्रणा, १२ स्वच्छतागृहे अनेक शाळांमध्ये संरक्षक भिंती, पेव्हिंग ब्लॉक आणि अन्य सुविधा उभारण्यात आल्या आहेत. हरित ऊर्जेला चालना देण्यासाठी ६० किलोवॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात आला असून, त्यामुळे ग्रामपंचायतीच्या वीज खर्चात दरवर्षी मोठी बचत होत आहे. तसेच विविध वाड्यांमध्ये सौर पथदिवे बसविण्यात आल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेतही वाढ झाली आहे.

**जलसंधारणातून शेतीला दिलासा**

जलसंधारण क्षेत्रात सहा जलसाठा संरचनांची निर्मिती व दुरुस्ती करण्यात आली आहे. त्यामुळे २,००० लाख लिटर अतिरिक्त पाणी साठवण क्षमता निर्माण झाली आहे. याचा लाभ ३०० एकरांहून अधिक शेती आणि ५०० पेक्षा अधिक शेतकऱ्यांना झाला आहे. याशिवाय, पुढील दोन वर्षांत २० हून अधिक नवीन जलसंधारण प्रकल्प उभारून सुमारे २,५०० लाख लिटर भूजल पुनर्भरण क्षमता निर्माण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये शेततळी, बंधारे, बोअरवेल रिचार्ज आणि पर्जन्यजल संधारणासारख्या उपाययोजनांचा समावेश आहे.

**पोषण शिक्षणातून निरोगी पिढी घडविण्याचा प्रयत्न**

शालेय विद्यार्थ्यांमध्ये सकस आहार आणि आरोग्यदायी जीवनशैलीची सवय निर्माण करण्यासाठी पुणे, सिंधुदुर्ग आणि मुंबई जिल्ह्यातील २३५ शाळांमध्ये पोषण शिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला आहे. या माध्यमातून सुमारे ६० हजार विद्यार्थ्यांपर्यंत सुरक्षित आणि सकस आहाराचा संदेश पोहोचविण्यात आला. ४७० शिक्षकांना 'हेल्थ अँड वेलनेस ॲम्बेसेडर' म्हणून प्रशिक्षित करण्यात आले असून, सर्व शाळांमध्ये 'सेहत क्लब' स्थापन करण्यात आले आहेत. अन्न सुरक्षा, स्वच्छता आणि पोषणविषयक जनजागृतीसाठी पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यात आला आहे.

**पुढील दोन वर्षांसाठी व्यापक कृती आराखडा**

या उपक्रमाचा पुढील टप्पा अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. आरोग्य सेवा अधिक सक्षम करणे, हेल्थ अँड वेलनेस सेंटरची गुणवत्ता वाढविणे, विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन, ग्रामीण क्रीडा विकासासाठी प्रगत प्रशिक्षण, तसेच जलसंधारण आणि भूजल पुनर्भरणाच्या नव्या प्रकल्पांची अंमलबजावणी यावर विशेष भर देण्यात येणार आहे. शासनाच्या विविध योजनांशी प्रभावी समन्वय साधत ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्य, शिक्षण, जलसुरक्षा आणि जीवनमानात शाश्वत सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने हा उपक्रम राज्यासाठी आदर्श ठरत असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

# मुंबई महानगरपालिकेची कॅन्टीन केली सील!

## एफडीएची धडक कारवाई; कर्मचाऱ्यांना जेवणाचा डबा ठेवावा लागणार सोबत

प्रतिनिधी २३ जुलै

**मुंबई :** सध्या आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांची संपूर्ण राज्यासह देशभर चर्चा आहे. अन्न व औषध प्रशासनानेचे आयुक्त आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या राज्यभरातील धडाकेबाज कारवायांनी अन्न माफियांवर मोठा आळा बसला आहे. याचदरम्यान तुकाराम मुंढे यांच्या एफडीएने आता थेट बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयातील कॅन्टीनमध्ये धाड टाकली. यानंतर बीएमसी मुख्यालयातील कॅन्टीन सील करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

तुकाराम मुंढेंच्या एफडीएकडून राज्यभरात अनेक छोट्यांपासून मोठ्या हॉटेलवर कारवाई करण्यात आली. आता एफडीएने मुंबई महानगरपालिकेच्या



मुख्यालयातील कॅन्टीनवर देखील कारवाई केली आहे. एफडीएच्या या कारवाईमुळे मुंबई महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना आज जेवणाचा डबा सोबत ठेवावा लागणार आहे. महानगरपालिका कॅन्टीनमध्ये दररोज ७ ते ८ हजारांपेक्षा अधिक लोक जेवून जातात, अशी माहिती आहे. यापूर्वीही एफडीएने स्वच्छतेच्या नियमांचे उल्लंघन झाल्याच्या कारणावरून मुंबईतील प्रसिद्ध के. रुस्तम आईस्क्रीम पार्लर, शालीमार रेस्टॉरंट आणि नूर मोहम्मदी रेस्टॉरंट यांच्या परवान्यांवरही निलंबनाची कारवाई केली होती.

**प्रसिद्ध व जुन्या पारशी डेअरीवरही कारवाई**

मुंबईतील मरीन लाइन्स परिसरातील शतकभर जुने आणि प्रसिद्ध पारशी डेअरी फार्मवर एफडीएने कारवाई करत संस्थेचा परवाना निलंबित केला आहे. बुधवारी करण्यात आलेल्या तपासणीत स्वच्छतेसंदर्भातील नियमांचे उल्लंघन आढळल्याचा आरोप करण्यात आला आहे. १९१६ मध्ये स्थापन झालेले पारशी डेअरी फार्म हे मुंबईतील ऐतिहासिक आणि प्रतिष्ठित खाद्य आस्थापनांपैकी एक मानले जाते. मात्र, तपासणीत आढळलेल्या कथित स्वच्छतेच्या त्रुटींमुळे एफडीएने ही कारवाई केली.

### तक्रारीसाठी तुकाराम मुंढेंनी एक सोपा मार्ग केला तयार

» आता कुठेही जेवण किंवा औषध भेसळयुक्त आढळल्यास एफडीकडे तक्रार करण्यासाठी तुकाराम मुंढेंनी एक सोपा मार्ग तयार केला आहे. सुशासन म्हणजे केवळ तंत्रज्ञानाचा वापर नव्हे, तर नागरिकांसाठी शासन अधिक सुलभ, जलद आणि उत्तरदायी बनवणे होय. महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने सुरू केलेले एआय-सक्षम नागरिक तक्रार पोर्टल हे त्याच दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे. आता कोणताही नागरिक मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत बोलून भेसळयुक्त अन्न, बनावट किंवा निकृष्ट दर्जाची औषधे तसेच सार्वजनिक आरोग्याशी संबंधित कोणत्याही उल्लंघनाबाबत तक्रार नोंदवू शकतो, असे तुकाराम मुंढे म्हणाले.

# संत ज्ञानेश्वर महाराजांच्या 750 व्या जयंतीनिमित्त टपाल विभागाकडून 'माय स्टॅम्प' जारी

प्रतिनिधी २३ जुलै

**मुंबई :** संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५०व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र सरकारने आयोजित केलेल्या एका कार्यक्रमादरम्यान, टपाल विभाग, महाराष्ट्र मंडळाने 'माय स्टॅम्प'चे प्रकाशन केले.



याप्रसंगी, मुख्य पोस्टमास्टर जनरल (महाराष्ट्र मंडळ), रामचंद्र किशन जायभाये यांनी एका विशेष 'माय स्टॅम्प'चे प्रकाशन केले आणि महाराष्ट्राचे सांस्कृतिक व माहिती तंत्रज्ञान (आयटी) मंत्री, आशिष शेलार यांना पहिला विशेष 'माय स्टॅम्प' अल्बम सादर केला. हा विशेष 'माय स्टॅम्प' महाराष्ट्राचे महान तत्त्वज्ञ आणि संत-कवी, संत ज्ञानेश्वर महाराजांच्या अमूल्य आध्यात्मिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक वारशाला दिलेली आदरांजली आहे. हा विशेष अंक टपाल तिकिटे आणि टपाल तिकीट संग्रहाच्या माध्यमातून भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा जतन आणि संवर्धित करण्याच्या भारतीय टपाल विभागाच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे.

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५०व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र शासनाने आयोजित केलेल्या कार्यक्रमांचा हा विशेष अंक एक महत्त्वाचा भाग होता. या कार्यक्रमांमधून संत ज्ञानेश्वर महाराजांचे जीवन, शिकवण आणि कालातीत साहित्यिक योगदानाचे स्मरण केले जाते. या ऐतिहासिक प्रसंगी टपाल विभागाला एक विशेष 'माय स्टॅम्प' प्रकाशित करण्याचा सन्मान मिळत आहे. याप्रसंगी श्रीराम पांडे, संचालक, महाराष्ट्र सांस्कृतिक कार्य संचालनालय; रुपेश सोनावले, वरिष्ठ अधीक्षक, टपाल कार्यालये, मुंबई उत्तर-पूर्व मंडळ; संतोषकुमार एस. कुलकर्णी, सहायक संचालक, टपाल सेवा (पीएसआर), महाराष्ट्र मंडळ; आणि इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.

# अवैध संबंधाचा दबाव सहन न झाल्याने कर्मचाऱ्यांकडून हत्या, मृतदेह जंगलात आढळला

प्रतिनिधी २३ जुलै

**मुंबई :** कल्याण तालुक्यात एका खळबळजनक खून प्रकरणाचा छडा लावत, ठाणे ग्रामीण पोलिसांनी मिंडा कंपनीच्या दोन कर्मचाऱ्यांना अटक केली आहे.

ठाण्यातील मिंडा कंपनीतील एका वरिष्ठ कर्मचाऱ्याच्या छळाला कंटाळून कनिष्ठ कर्मचाऱ्यांनी त्याचा खून केला. पोलीस चौकशीदरम्यान, दोन्ही आरोपींनी सांगितले की, तो माणूस अनेक महिन्यांपासून त्यांचा छळ करत होता, त्यांच्यावर अयोग्य, अनैसर्गिक आणि अनैतिक संबंधांसाठी दबाव टाकत होता आणि त्यांचे शोषण करत होता. यामुळे संतापून त्यांनी त्याचा खून केला, मृतदेह जंगलात फेकून दिला आणि मृताच्या गळ्यातील सोन्याची साखळीही चोरली.

**संपूर्ण प्रकरण काय आहे?**

२८ जून २०२६ रोजी, ठाणे जिल्ह्यातील कल्याण तालुक्यात, मुरबाड अहिल्यानगर रस्त्यावरील मामनोली गावाच्या जंगलात एका अनोळखी माणसाचा मृतदेह सापडल्याने परिसरात खळबळ उडाली होती. कल्याण तालुका पोलिसांनी खून आणि पुरावा नष्ट केल्याचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन, पोलीस अधीक्षक डॉ. विनय कुमार राठोड, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा आणि कल्याण तालुका पोलिसांची सहा विशेष पथके तयार करण्यात आली. तपासादरम्यान, मृत व्यक्तीची ओळख ४२ वर्षीय किशोरचंद्र कार्तिक साहू अशी पटली, जो मुरबाड येथील मिंडा कंपनीत काम करत होता.

पोलिसांनी घटनास्थळाच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, कंपनीच्या कॅमेऱ्यांमधील रेकॉर्डिंग आणि तांत्रिक पुराव्यांचे विश्लेषण केले. तपासाअंती कंपनीत काम करणाऱ्या दोन कनिष्ठ कर्मचाऱ्यांवर संशय आला. त्यानंतर, पोलिसांनी सौरभ विश्वनाथ गोलहे (२४) आणि ज्ञानेश्वर दत्तात्रेय कांठे (२८) यांना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी केली, ज्यांनी हत्येची कबुली दिली.

प्राथमिक तपासानुसार, दोन्ही आरोपी मृत व्यक्तीवर नाराज होते.

# पत्रकारांच्या सुरक्षेचा प्रश्न; जंतर-मंतर हल्ल्याप्रकरणी मुंबई प्रेस क्लब आक्रमक

प्रतिनिधी २३ जुलै

**मुंबई :** दिल्लीतील जंतर मंतर येथे झालेल्या विद्यार्थी आंदोलनादरम्यान पत्रकारांवर झालेल्या कथित हल्ल्यांचा आणि त्यांना दिलेल्या गैरवर्तनाचा देशभरातील प्रसारमाध्यम संघटना तीव्र शब्दांत निषेध करत आहेत. या संदर्भात, मुंबई प्रेस क्लबने या घटनेला लोकशाहीवरील थेट हल्ला म्हटले असून, या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी आणि दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. मुंबई प्रेस क्लबने जारी केलेल्या अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, पत्रकार जेव्हा



आपली व्यावसायिक कर्तव्ये पार पाडत असतात आणि जनतेला वार्तांकन करत असतात, तेव्हा त्यांना लक्ष्य करणे अस्वीकार्य आहे. प्रेस क्लबने म्हटले आहे की, अशी हिंसा ही प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य दडपण्याचा एक गंभीर प्रयत्न आहे. प्रेस क्लबने प्रशासनाला आवाहन केले आहे की, पत्रकारांच्या संरक्षणासाठी ठोस पावले उचलली जावीत आणि कर्तव्यावर असताना त्यांना कोणत्याही प्रकारच्या छळाचा सामना करावा लागू नये.

**घटनेची पार्श्वभूमी**

दिल्लीतील जंतर मंतर येथे नुकत्याच झालेल्या विविध राजकीय आणि सामाजिक आंदोलनांचे वार्तांकन करत असताना ही घटना घडली, ज्यात सरन्यायाधीशांचा संसद मोर्चा आणि सोनम वांगचुक यांच्याशी संबंधित आंदोलनांचा समावेश होता. काही प्रसारमाध्यम कर्मचाऱ्यांवर कथितरित्या हल्ला करण्यात आला आणि त्यांच्या उपकरणांचे नुकसान करण्यात आले, ज्यामुळे पत्रकारांमध्ये मोठ्या प्रमाणावर संताप निर्माण झाला.

**पत्रकार संघटनांच्या मागण्या?**

स्वतंत्र चौकशी

जंतर मंतर घटनेचे वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांवरील हल्ल्यांची निष्पक्ष आणि स्वतंत्र न्यायालयीन किंवा प्रशासकीय चौकशी व्हावी, अशी मागणी माध्यम संघटनांनी केली आहे.

**सुरक्षेची हमी**

पत्रकारांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी पोलीस आणि प्रशासकीय स्तरावर कडक सूचना देण्याची विनंती करण्यात आली आहे.

**दोषींवर कठोर कारवाई करावी**

व्हिडिओ फुटेज आणि इतर पुराव्यांच्या आधारे हल्लेखोरांना ओळखण्यात आले असून, त्यांच्यावर तातडीने कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# मुंबईकरांनो सावधान! 23 जुलै ते 6 ऑगस्टपर्यंत कलम 144 लागू, जमण्यावर निर्बंध

प्रतिनिधी २३ जुलै

**मुंबई :** दिल्लीतील जंतर मंतर येथे सुरू असलेल्या नीट परीक्षा आंदोलनाच्या समर्थनार्थ मुंबईतील आझाद मैदान आणि मुंबई विद्यापीठाबाहेर नुकत्याच झालेल्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर, मुंबई पोलिसांनी शहरात प्रतिबंधात्मक आदेश लागू केला आहे. महाराष्ट्र पोलीस कायद्यांतर्गत पोलीस उपआयुक्त (ऑपरेशन्स) अकबर पठाण यांनी जारी केलेल्या आदेशानुसार, आज २३ जुलै रोजी मध्यरात्री १२:०१ पासून ते ६ ऑगस्ट रोजी मध्यरात्रीपर्यंत शहरात पाच किंवा अधिक



व्यक्तींच्या एकत्र येण्यावर संपूर्ण बंदी असेल.

**आदेशातील प्रमुख मुद्दे आणि निर्बंध**

सार्वजनिक ठिकाणी पाचपेक्षा जास्त लोकांचे एकत्र येणे, परवानगीशिवाय मिरवणुका/मोर्चे काढणे, लाऊडस्पीकर आणि संगीत बँड वाजवणे, तसेच सार्वजनिक मिरवणुकीत फटाके फोडण्यास सक्त मनाई आहे. गुप्त माहिती आणि शांतता भंग होण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलीस प्रशासनाने ही खबरदारीची उपाययोजना केली आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल.

**सूट दिलेली क्षेत्रे आणि कार्यक्रम**

सामान्य जनजीवन विस्कळीत होऊ नये यासाठी, पोलिसांनी खालील गोष्टींना या आदेशातून सूट दिली आहे.

सामाजिक आणि कौटुंबिक मेळावे: विवाह सोहळे, अंत्यविधी आणि अंत्ययात्रा.

व्यावसायिक आणि शैक्षणिक संस्था: शाळा, महाविद्यालये, कोचिंग संस्था, न्यायालये, सरकारी कार्यालये, कारखाने, दुकाने आणि व्यावसायिक आस्थापने.

मनोरंजन आणि सभा: चित्रपटगृहे, नाट्यगृहे आणि क्लब/संस्थांच्या वैधानिक व नियमित सभा.

विशेष परवानगी: संबंधित क्षेत्राच्या विभागीय डीसीपींच्या पूर्वपरवानगीने काढण्यात येणाऱ्या मिरवणुका आणि मेळावे.



मुंबईसह राज्यभरात पोलिसांकडून विद्यार्थ्यांचे अटकसत्र व दडपशाही विरोधात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्त्वाखाली काँग्रेस नेत्यांचे शिष्टमंडळ आज गुरुवार, दि. २३ जुलै रोजी दुपारी राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांची त्यांच्या कार्यालयात भेट देण्यात आले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ♦ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ♦ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 26 /A 3072, RRC Helpline No. 8484842135